रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १३१
www.ramprahar.com
बुधवार, २७ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## संविधानाचे ७५वे वर्ष सर्वांसाठी गौरवास्पद –पीएम मोदी



**नवी दिल्ली :** संविधानाचे अमृत महोत्सवी अर्थात ७५वे वर्ष सर्वांसाठी गौरवास्पद आहे. देशात अनेक प्रकल्प सुरू आहेत. वेळेत पूर्ण होणारे प्रकल्प लोकांवर सकारात्मक प्रभाव टाकतात. आजच्याच दिवशी १९४९ रोजी राजेंद्र प्रसाद यांनी केलेल्या भाषणात राष्ट्र प्रथम ही घोषणा केली होती, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र यांनी मंगळवारी (दि. २६) येथे केले. ते संविधान दिनानिमित्त सर्वोच्च न्यायालयाती आयोजित कार्यक्रमात बोलत होते. पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणादरम्यान भारताला आव्हान देणाऱ्या आतंकवादी संघटनांना जशास तसे उत्तर देण्यात येईल, असा इशारा दिला. कार्यक्रमादरम्यान पंतप्रधानांनी २६/११ हल्ल्यातील शहीदांना श्रद्धांजली अर्पण केली तसेच संविधान सभेच्या सदस्यांनाही अभिवादन केले.

### अंतरंग

चार शेपट्या, एक शीर असलेल्या प्राण्याची अफवा/२
सर्प-विंचूदंशावर रायगडात प्रशासनाची विशेष मोहीम/५
नागोठण्यात महायुतीच्या कार्यकर्त्यांचा जल्लोष/७

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा राजीनामा

### काळजीवाहू सीएम म्हणून काम पाहणार



मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसमवेत मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर, दादाजी भुसे व इतर नेतेगणही

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची मंगळवारी (दि. २६) राजभवन येथे भेट घेऊन त्यांना आपल्या पदाचा तसेच मंत्रिमंडळाचा राजीनामा सादर केला. या वेळी राज्यपालांनी मुख्यमंत्र्यांना पर्यायी व्यवस्था होईपर्यंत कार्यभार सांभाळण्यास सांगितले. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसमवेत मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर, दादाजी भुसे व इतर नेतेगणही उपस्थित होते. राजभवानाबाहेर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना केसरकर म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राजीनामा देणे म्हणजे औपचारिकता आहे. त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा राज्यपालांकडे दिला तसेच काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून कार्यभार स्वीकारला आहे.

नवे सरकार कधी स्थापन होईल यावर केसरकर यांनी सांगितले की, येत्या काही दिवसांत नवे सरकार स्थापन होईल. उद्या भाजप आमदारांची बैठक बोलावण्यात आली आहे. त्या बैठकीत भाजपच्या गटनेत्याची निवड होईल. त्यानंतर तिन्ही पक्षांचे नेते (शिंदे, फडणवीस, पवार) एकत्र बसून चर्चा करतील आणि पक्षश्रेष्ठींकडे (भाजप) जातील. पक्षाश्रेष्ठींच्या सूचनेनुसार सरकार स्थापन होईल. आपला नेता मुख्यमंत्री व्हावा अशी भावना प्रत्येक कार्यकर्त्याची असते, मात्र तिन्ही पक्षांनी स्पष्ट केलंय पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह जो निर्णय घेतील तो सर्वांना मान्य असेल.



## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयानंतर अभिनंदनासाठी सलग चौथ्या दिवशीही रीघ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघामध्ये सलग चौथ्यांदा विजय संपादन करून आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. गेल्या चार दिवसांपासून आमदार प्रशांत ठाकूर व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना अभिनंदन करण्यासाठी नागरिकांची अक्षरशः रीघ लागली आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली जात आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी यंदा विधानसभा निवडणुकीत विजयाचा चौकार मारला आहे. त्यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या बाळाराम पाटील यांना एक, दोन नव्हे; तर तीनदा पराभूत केले आहे. लाल बावट्याचा गड उद्ध्वस्त करणाऱ्या आमदार प्रशांत ठाकूर यांच्या बाजूने सलग चौथ्यांदा पनवेलकरांनी कौल दिला आहे. विरोधकांनी अपप्रचारातून मोठी फिल्डिंग लावली असताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी विजयाचा स्ट्रेट ड्राइव्ह मारला. (पान २ वर..)

*आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या विकासकामांना पनवेलची जनता साक्षीदार आहे. त्यामुळे त्यांचा विजय निश्चित होता. आज त्यांना आमच्या संस्थेच्या वतीने पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. चारवेळा आमदार झाले असतानाही त्यांच्या वागण्यात बडेजाव आला नाही. त्यांना सर्वसामान्य माणसाची जाण आहे.*
**–वैशाली जगदाळे**, संस्थापिका, संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्था

*सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांनी कायम केले आहे. सर्व समाजाला मानणारे असे ते व्यक्तीमत्व आहे. लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी केलेली कामे आदर्शवत आहेत. त्यांच्या दूरदृष्टीने पनवेलच्या सर्वांगीण विकासाला गती मिळाली. त्यांच्या संकल्पनेनुसार खारघरमध्ये नाट्यगृह उभारले जाणार आहे आणि त्या माध्यमातून या ठिकाणी नाट्य, कला, सांस्कृतिक क्षेत्राला अधिक चालना मिळेल. अशी लोकहिताची कामे आमदार प्रशांत ठाकूर करीत आहेत. त्याबद्दल आणि पुन्हा विजयी झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन!*
**–उमेश निवृत्तीबुवा चौधरी**, रायगड भूषण

## ‘नैना’संदर्भात तातडीने बैठक घ्या

### आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांची मागणी




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नैना प्राधिकरणाच्या कार्यपद्धतीसंदर्भात तातडीने बैठक आयोजित करण्याची आग्रही मागणी पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी सिडकोकडे केली आहे. या संदर्भात त्यांनी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांना निवेदन दिले आहे.

या निवेदनात शेतकऱ्यांची भूमिका मांडताना आमदारद्वयीने म्हटले आहे की, सिडकोमार्फत नैना नियोजन प्राधिकरण हद्दीतील अनेक घरे अथवा बांधकामांना अनधिकृत असल्याबाबत निरनिराळ्या वेळी अनेक नोटीस देण्यात आल्या आहेत. वस्तुतः ही सर्व घरे शेतकऱ्यांनी स्वतःच्या जागेत बांधली असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याचा इशारा म्हणजे शेतकऱ्यांच्या अधिकारावर होणारे अतिक्रमण आहे. या संदर्भात वारंवार सूचना देऊनही प्राधिकरणामार्फत एखाद्या जुलुमशहाप्रमाणे सिडको प्राधिकरणाची वागणूक दिसून येत आहे. सिडकोला जर नैना परिसरात विकास करायचा असेल तर शेतकऱ्यांना कस्पटासमान वागणूक देऊन सिडको सहकार्याची अपेक्षा करू शकत नाही. म्हणूनच यापुढे नैना क्षेत्रात विकासकामासंदर्भात कोणतेही पाऊल उचलण्यापूर्वी पुढील कार्यवाहीबाबत माहिती देण्यासाठी प्रकल्पातील शेतकऱ्यांच्या प्रतिनिधीसोबत तातडीने एका बैठकीचे आयोजन करावे, अशी मागणी त्यांनी या निवेदनातून केली आहे तसेच शेतकऱ्यांच्या संदर्भात अन्यायकारी भूमिका घेतल्यास सिडको प्रशासनाविरोधात उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशाराही आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी सिडकोला दिला आहे.

## जिंकता तेव्हा ईव्हीएम चांगले आणि पराभूत झाल्यावर ईव्हीएममध्ये छेडछाड!

### सर्वोच्च न्यायालयाने फटकारले; बॅलेट पेपरची याचिका फेटाळली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. ईव्हीएममध्ये छेडछाड केली जात असल्याचा मुद्दा उपस्थित करत ही मागणी करण्यात आली होती. यावर सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांची कानउघाडणी करत मागणी फेटाळून लावली. ‘तुम्ही जिंकता तेव्हा ईव्हीएम चांगले आणि पराभूत होतात तेव्हा ईव्हीएममध्ये छेडछाड’, अशा शब्दात कोर्टाने झापले.

ईव्हीएम बंद करून पुन्हा बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यात याव्यात, अशी मागणी करणारी याचिका के.ए. पॉल यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि पी. बी. वराळे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. ईव्हीएमध्ये छेडछाड होऊ शकते याबद्दलच्या एलॉन मस्क यांच्या विधानाचाही संदर्भ याचिकाकर्त्यांनी दिला. त्याचबरोबर १५०पेक्षा अधिक देशात बॅलेट पेपरद्वारे निवडणूक होतात, असेही कोर्टात सांगितले.

यावर न्यायमूर्ती म्हणाले, काय होतंय, जेव्हा तुम्ही जिंकता तेव्हा ईव्हीएममध्ये छेडछाड नसते, पण जेव्हा तुम्ही पराभूत होता तेव्हा ईव्हीएमसोबत छेडछाड झालेली असते. जगापेक्षा तुम्हाला वेगळे का नकोय?, असा सवालही न्यायमूर्तींनी या वेळी याचिकाकर्त्यांना केला.

## निवडक

### पॅन कार्ड आता क्युआर कोडसह; विनामूल्य केले जाणार अपग्रेड

**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत १,४३५ कोटी रुपयांच्या पॅन २.० प्रोजेक्टला मान्यता देण्यात आली आहे. पॅन २.० प्रोजेक्ट अंतर्गत पॅन कार्ड क्युआर कोडसह विनामूल्य अपग्रेड केले जाईल. या संदर्भात माहिती देताना केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवे पॅनकार्ड आले तरी पॅन नंबर बदलला जाणार नाही, असे स्पष्ट करून अपग्रेड प्रक्रियेतून विविध फिचर्ससह नवे पॅन कार्ड मिळेल, असे सांगितले.

### उरणमध्ये आजपासून पुन्हा एनएमएमटी बस धावणार!

**उरण :** फेब्रुवारी महिन्यामध्ये उरण तालुक्यातील खोपटे येथे झालेल्या भीषण अपघातानंतर एनएमएमटीची बससेवा नवी मुंबई परिवहन बससेवेच्या व्यवस्थापनाने कामगारांची सुरक्षा आणि तोट्यात चालणारा मार्ग ठरवून अनिश्चित काळासाठी उरणमध्ये बंद केली होती. आता बुधवार (दि. २७) पासून उरण तालुक्यात एनएमएमटीची बससेवा पुन्हा सुरू होणार असल्याची माहिती व्यवस्थापक योगेश कडूस्कर यांनी दिली. त्यामुळे जनतेत आनंदाचे वातावरण आहे.

## कर्जतमध्ये ९५ जणांनी रक्तदान करून शहिदांना वाहिली आदरांजली

**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबईतील २६/११च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या स्मरणार्थ कर्जतमध्ये रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. ९५ जणांनी रक्तदान करून शहिदांना आदरांजली वाहिली. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले कर्जत-खालापूर तालुक्यातील हे ५०१वे रक्तदान शिबिर ठरले.



कर्जत पोलीस ठाणे आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने २६/११ या शहीद दिनाच्या निमित्ताने भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले. प्रारंभी शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कर्जत पोलीस ठाण्याच्या सभागृहात झालेल्या या शिबिराचे उद्घाटन निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन समारंभास सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष आशिष गोखले, अभिजित मराठे, सहाय्यक पोलीस निरीक्षक तौसिफ सय्यद, उपनिरीक्षक निरीक्षक जयवंत वारा, उपनिरीक्षक किर्तीकुमार गायकवाड, अंमलदार उपस्थित होते.

या वेळी बोलताना सुरेंद्र गरड यांनी, हा उपक्रम अतिशय चांगला आहे. २६/११च्या हल्ल्यात शहीद झालेल्यांना ही खऱ्या अर्थाने आदरांजली आहे. प्रत्येक वर्षी हा उपक्रम व्हायला पाहिजे. त्यासाठी आमचे संपूर्ण सहकार्य राहील, असे सूचित केले. (पान २ वर..)

## भाजपतर्फे संविधान दिन साजरा



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागमधील भारतीय जनता पक्ष दक्षिण जिल्हा कार्यालय येथे मंगळवारी (दि. २६) संविधान दिन साजरा करण्यात आला. त्याचप्रमाणे शहरातील पोलीस ठाणे, तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी यांना संविधानाच्या प्रती भेट देण्यात आल्या.

भाजप दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील, रायगड लोकसभा मतदारसंघ संयोजक सतीश धारप, दक्षिण रायगड सरचिटणीस ॲड. महेश मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग येथील भाजप दक्षिण विभाग कार्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. या वेळी संविधानाचे पूजन करण्यात आले. त्याचप्रमाणे अलिबाग शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याला पुष्पहार घालून विनम्र अभिवादन करण्यात आले.

या वेळी भाजपचे अलिबाग तालुका उपाध्यक्ष सुनील दामले, सरचिटणीस राजेश पाटील, ओबीसी सेल दक्षिण जिल्हा सरचिटणीस अशोक वारगे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष रोशन भगत, सरचिटणीस स्वप्नील गाडे, उपाध्यक्ष सुबोध पाटील, जयेश वाडेकर, सतीश पाटील, संकेत पाटील, सुदीप बिर्जे, कामगार मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष संजय यादव, तालुका उपाध्यक्ष प्रशांत पवार उपस्थित होते.

## अलिबाग वरसोलीत आंग्रेकालीन विठ्ठल मंदिराचा जत्रोत्सव सुरू




**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील आंग्रेकालीन विठ्ठल मंदिराचा जत्रोत्सव मंगळवारी (दि. २६) सुरू झाला आहे. पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

पहाटे काकड आरतीने जत्रोत्सवाची सुरुवात झाली. त्यानंतर मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. सकाळपासूनच मंदिरात दर्शनासाठी रांग लागली होती. जत्रोत्सवानिमित्त मंदिरात भजन, कीर्तन अशा धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई केली गेली आहे. व्युत्पत्ती एकादशीपासून अमावस्येपर्यंत पाच दिवस भरणारी ही जत्रा यंदा सहा दिवस (१ डिसेंबपर्यंत) चालणार आहे.

## राज्यातील सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन

### ■ राज्यस्तरीय प्रथम क्रमांकास एक लाख, तर रायगड जिल्हास्तरीय ४० हजार रुपये बक्षीस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली शैक्षणिक, सामाजिक, कला. क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने २४व्या राज्यस्तरीय आणि रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

दिवाळी अंक महाराष्ट्राची पूर्वापार चालत आलेली एक सांस्कतिक परंपरा आहे. ही परंपरा अखंडपणे चालू राहावी व त्यातून दर्जेदार दिवाळी अंकांची निमिर्ती व्हावी यासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने गेल्या २३ वर्षांपासून महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून यंदा ही २४वी स्पर्धा आहे.



भरघोस रकमेची पारितोषिक असलेल्या या स्पर्धेच्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेमधील विजेत्या प्रथम क्रमाकांस एक लाख रुपये, व्दितीय क्रमाकांस ५० हजार, तर तृतीय क्रमाकांस ३० हजार रुपये तसेच आकर्षक सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर या स्पर्धेतील उत्कृष्ट विशेषांकाला १५ हजार रुपये, उत्कृष्ट कथेसाठी सात हजार रूपये, उत्कृष्ट कविता, उत्कृष्ट व्यंगचित्र, उत्कृष्ट लेख, लक्षवेधी परिसंवाद, लक्षवेधी मुलाखत व उत्कृष्ट मुखपृष्ठ यांना प्रत्येकी पाच हजार रुपये; त्याचबरोबर बालसाहित्याच्या सर्वोत्कृष्ट अंकास ७५०० रुपये देण्यात येतील. रायगड जिल्ह्यातून प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकांसाठी खास पारितोषिके देण्यात येणार असून यामध्ये प्रथम क्रमांकास ४० हजार रुपये, व्दितीय क्रमांकास २० हजार रुपये आणि तृतीय क्रमांकास १० हजार रुपये, दोन उत्तेजनार्थ प्रत्येकी पाच हजार रुपये, उत्कृष्ट कथा, कविता आणि व्यंगचित्र यांना प्रत्येकी पाच हजार रुपये आणि सर्व पुरस्कारप्राप्त अंकांना सन्मानचिन्ह असे बक्षिसांचे स्वरूप आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही या स्पर्धेत स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, संयोजक दीपक म्हात्रे यांनी केले आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दिवाळी अंकाच्या दोन प्रती १०० रुपये प्रवेश फीसह १५ डिसेंबरपर्यंत पाठवाव्यात. दिवाळी अंक पाठविण्यासाठी व अधिक माहितीसाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, प्लॉट क्रमांक ४७५, मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड येथे अनिल कोळी (९७६९४०९१६१) यांच्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन आयोजकांनी केले आहे.

# २६/११ दहशतवादी हल्ल्यातील पोलीस हुतात्म्यांना राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून अभिवादन

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात पोलीस जवानांना हौतात्म्य प्राप्त झाले होते. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हुतात्मा पोलीस अधिकारी व जवानांना पुष्पचक्र वाहून आदरांजली अर्पण केली.

१६व्या हुतात्मा स्मृतीदिनी मुंबई पोलीस मुख्यालयातील पोलीस स्मारक येथे शहीद पोलीस अधिकारी आणि जवानांना पोलीस दलामार्फत आदरांजली अर्पण करण्यात आली. पोलीस बँड पथकाने सलामी शस्त्र दिली तसेच बिगुलर्स लास्ट पोस्ट वाजविले. या वेळी पोलीस अधिकारी व जवानांनी हुतात्म्यांना सलामी देत अभिवादन केले. राज्यपालांनी हुतात्मा पोलीस कुटुंबातील सदस्यांची तसेच उपस्थित आजी व माजी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेतली.

मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, उपनगर जिल्हा पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. इकबाल सिंह चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांनीदेखील हुतात्म्यांना अभिवादन केले.





## चार शेपट्या आणि एक शीर असलेला प्राणी आढळल्याची रोह्यात अफवा

### मासेमारी जाळ्यात तीन मरीन फाइल साप

**पाली : प्रतिनिधी**

कुंडलिका नदीवरील रोहा अष्टमी पुलानजीक चार शेपटी व एक शीर असलेला प्राणी आढळून आल्याची अफवा जवळच्या भागात वाऱ्यासारखी पसरली. त्या प्राण्याला बघण्यासाठी प्रचंड गर्दी जमा झाली, मात्र सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था रायगड टीमच्या सदस्यांनी मासेमारी ते जाळ्यात अडकले तब्बल तीन मरीन फाइल साप असल्याचे समोर आणले. यातील दोन साप मृत झाले होते, तर एका सापाला वाचविण्याचा प्रयत्न केला मात्र अखेर त्याचाही मृत्यू झाला. विशेष म्हणजे रोहा तालुक्यात पहिल्यांदाच हा साप आढळून आला आहे.

याबाबत वन्यजीव रक्षक सागर दाहिंबेकर यांनी सांगितले की, या वेळेस सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था रायगड संस्थेतील सदस्य त्या मार्गावरून जात होते. गर्दी पाहून तेदेखील थांबले व घटनेची संपूर्ण माहिती घेतली तो जीव नेमका काय आहे हे पाहण्यासाठी जवळच असलेल्या एका होडीच्या सहाय्याने त्या अनोळखी जीवाजवळ पोहचले. त्या ठिकाणी गेल्यानंतर असे निदर्शनात आले की, एक मासे पकडणाऱ्या जाळ्यामध्ये तब्बल तीन मरीन फाइल स्नेक अडकले आहेत. त्यापैकी दोन सापांचा मृत्यू झाला होता, तर एक साप जिवंत होता. त्या सापांना बाहेर काढल्यानंतर त्यातील तिसऱ्या सापाचादेखील मृत्यू झाला.



**समुद्रातील एकमेव बिनविषारी साप**

*मरीन फाईल साप हा मुख्यत समुद्र, खाडी व नदीचा संगम जिथे समुद्रात होतो म्हणजे खार व गोड पाणी मिश्रण तिथे अधिवासात सापडतो. मरीन फाईल साप एकमेव बिनविषारी समुद्री साप आहे बाकीचे ९९% टक्के समुद्री साप विषारी असून घातक आहेत, पण माणसांना दंश झाल्याची घटना खूप दुर्मिळ आहे. समुद्री साप माणसांच्या संपर्कात येण्याचे मुख्य कारण म्हणजे चुकून मासेमारी जाळ्यात अडकून येणे व त्यामुळे त्यांचा मृत्यू होणे. परिणामी त्यांची संख्या धोक्यात आहे. समुद्री फाईल साप प्रजाती हा त्याच्या श्रेणीतील सर्वात सामान्य सागरी सापांपैकी एक आहे, अशी माहिती आनंद मोहिते यांनी दिली.*

## पोलादपूर, महाड, माणगाव तालुक्यातील माजी सैनिक, विधवा, अवलंबित डिफेन्स पेन्शनधारकांसाठी भेट दौरा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पोलादपूर, महाड व माणगाव तालुक्यातील जे माजी सैनिक, विधवा, अवलंबित डिफेन्स पेन्शनधारक आहेत आणि ज्यांची पेन्शन स्पर्श पोर्टलमध्ये स्थलांतर झाली नाही, अशा माजी सैनिक, विधवा, अवलंबितांसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, रायगड-अलिबाग कार्यालयाचे प्रतिनिधी या तालुक्यांना भेटी देणार असून भेट दौऱ्याचे नियोजन करण्यात आले आहे.

माणगाव तालुक्याकरिता २ डिसेंबर रोजी प्रतिनिधी भेट देणार असून माणगाव तहसीलदार कार्यालय व माजी सैनिक संघटना कार्यालय  माणगाव हे दौऱ्याचे ठिकाण आहे.

पोलादपूर तालुक्याकरिता ३ ते ५ डिसेंबर रोजी प्रतिनिधी भेट देणार असून पोलादपूर कचेरी कार्यालय हे दौऱ्याचे ठिकाण आहे.

महाड तालुक्याकरिता ६ व ७ डिसेंबर रोजी प्रतिनिधी भेट देणार असून सैनिकी विश्रामगृह महाड नवेनगर दौऱ्याचे ठिकाण आहे.

याकरिता माजी सैनिक, विधवा, अवलंबित डिफेन्स पेन्शनधारकांना भेटी दौऱ्यावेळी मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत, मूळ पीपीओ व त्याची छायांकित प्रत, डिस्चार्ज बूक व छायांकित प्रत, आधारकार्ड व पॅन कार्ड छायांकित प्रत, बँक पासबूक व छायांकित प्रत, मोबाईल नंबर ही आवश्यक लागणारी कागदपत्रे सोबत आणावीत.

जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, विधवा, अवलंबित जे डिफेन्स पेन्शनधारक आहेत आणि ज्यांची पेन्शन स्पर्श पोर्टलमध्ये स्थलांतर झाली नाही अशा माजी सैनिक, विधवा, अवलंबितांनी कार्यालयीन दिवशी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, रायगड-अलिबाग येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत भेट देऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल वैजनाथ माने (नि.) यांनी केले आहे.

## रायगड जि.प.मध्ये संविधान दिन साजरा

**अलिबाग** : रायगड जिल्हा परिषदेत संविधान दिन मंगळवारी (दि.२६) साजरा करण्यात आला. संविधान दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी पुष्पहार अर्पण करीत आदरांजली वाहिली. यानंतर उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन केले.

या वेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, मुख्य लेखा वित्त अधिकारी राहुल कदम, ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले, प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव, महिला व बालविकास अधिकारी निर्मला कुचिक, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शामराव कदम, बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता राहुल देवांग यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## माझे पसंतीचे सिडकोचे घर महागृहनिर्माण योजनेला प्रतिसाद

### एक महिन्यात ९२ हजारांहून अधिक अर्ज प्राप्त

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाच्या माझे पसंतीचे सिडकोचे घर या महागृहनिर्माण योजनेला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभत असून योजनेचा प्रारंभ केल्यापासून सुमारे एक महिन्याच्या कालावधीत ९२ हजारांहून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत. या गृहनिर्माण योजनेकरिता अधिकाधिक नागरिकांना अर्ज करता यावा याकरिता योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीसही ११ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

सिडकोतर्फे ११ ऑक्टोबर रोजी माझे पसंतीचे सिडकोचे घर या महागृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात येऊन या योजनेंतर्गत नवी मुंबईच्या वाशी, बामणडोंगरी, खारकोपर, खारघर, तळोजा, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल आणि कळंबोली नोडमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटाकरिता २६ हजार सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. अर्जदारांना आपल्या पसंतीची सदनिका निवडण्याचे स्वातंत्र्य हे या योजनेचे वैशिष्ट्य आहे.

परवडणाऱ्या दरासह परिपूर्ण पायाभूत सुविधा, कनेक्टिव्हीटी, दर्जेदार बांधकाम आणि नवी मुंबईतील समृद्ध जीवनशैली अनुभवण्याची संधी या गृहनिर्माण योजनेद्वारे उपलब्ध करून देण्यात आली. सिडकोच्या अन्य गृहनिर्माण योजनांप्रमाणेच या गृहनिर्माण योजनेसही नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभून आजपर्यंत ९२ हजारांहून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत.

योजनेकरिता अधिकाधिक नागरिकांना अर्ज करता येऊन त्यांचे घराचे स्वप्न साकार व्हावे याकरिता योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस ११ डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अर्ज नोंदणीस मुदतवाढ देण्यात आल्याने अर्जदारांना उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवास प्रमाणपत्र इ. आवश्यक त्या कागदपत्रांची जमवाजमव करण्यासाठीही पुरेसा अवधी मिळणार आहे.

ऑनलाइन नोंदणी करताना बारकोड असलेले प्रमाणपत्र सादर करण्याची अटही शिथिल करण्यात आली आहे. ऑनलाइन नोंदणी करताना बारकोड नसलेले रहिवास प्रमाणपत्र सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे, परंतु वाटपपत्र देण्यापूर्वी बारकोड असलेले रहिवास प्रमाणपत्र सादर करणे अर्जदारांना अनिवार्य असणार आहे. तसेच १०० किंवा रु. ५०० मूल्याच्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र वा वचनपत्र सादर करण्याची अटही शिथिल करण्यात आली आहे. अर्जदारांना कोऱ्या कागदावर स्वसाक्षांकित शपथपत्र, वचनपत्र सादर करता येणार आहे.

या गृहनिर्माण योजनेद्वारे नवी मुंबईसारख्या सोयी सुविधांनी सुसज्ज शहरामध्ये घराचे स्वप्न साकार करण्याची सुवर्णसंधी नागरिकांना लाभली आहे. तरी अधिकाधिक नागरिकांनी आपले घराचे स्वप्न साकार करण्यासाठी योजनेकरिता अर्ज करावा.

## गवळी समाजाकडून आमदार दळवींचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

अलिबाग मुरूड विधानसभा क्षेत्रातून आमदार महेंद्र दळवी हे २९ हजार ५६५ अशा मोठ्या मताधिक्याने विजयी झाले आहेत. या मतदारसंघातून सलग दुसरी वेळ निवडून येण्याचा विक्रमसुद्धा बिगरशेकाप आमदार दळवी यांनी केला आहे. शांत स्वभाव व सर्वसामान्य नागरिक यांची तत्परतेने काम करण्याची वृत्ती असल्याने दळवी हे जनतेचे आवडते आमदार बनले आहेत. सलग दुसऱ्यांदा निवडून आल्याबद्दल गवळी समाज बांधवांकडून त्यांचा नुकतच सत्कार करण्यात आला.





आमदार दळवी यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी रायगड, ठाणे व सोलापूर विभगाचे गवळी समाज अध्यक्ष राजेश मेहेतर व शिवसेनेचे रायगड जिल्ह्याचे संघटक दिनेश मिणमिने यांच्या हस्ते आमदार दळवी यांना सन्मानित करण्यात आले. याच कार्यक्रमात गवळी समाज भगिनी शिवसेनेच्या राजपुरी जिल्हा परिषद गणाच्या मुख्य संपर्क प्रमुख जीविता मिणमिने व वावडुंगी ग्रामपंचायत सरपंच ऋतुजा दीपेश वरणकर यांनीदेखील आमदार दळवी यांचा सत्कार केला.

या वेळी शिवसेनेचे जिल्हा संघटक दिनेश मिणमिने यांनी सांगितले की, विकासाची संकल्पना काय असते हे आमदार महेंद्र दळवी यांनी आपल्या मतदारसंघात दाखवून दिले आहे. येईल त्याचे काम व जनतेचा सन्मान राखण्याचे काम आमदारसाहेबांनी सातत्य पूर्ण राखल्यानेच येथील जनतेने मोठ्या मताधिक्याने त्यांना निवडून दिले आहे.

पुढील काळातसुद्धा ते आपल्या विकासकामांची गंगा अविरत सुरू ठेऊन अलिबाग मुरुड विधानसभा क्षेत्राचा कायापालट करतील, असा विश्वासही मिणमिने यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमास असंख्य समाज बांधव उपस्थित होते.

पान १ वरुन

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विजयानंतर अभिनंदनासाठी सलग चौथ्या दिवशीही रीघ





आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अभिनंदनासाठी २३ नोव्हेंबरपासून निवासस्थानी आणि कार्यालयामध्ये सकाळपासून नागरिक, कार्यकर्ते, सामाजिक संस्थेचे पदाधिकारी, त्याचबरोबर इतरांनी अक्षरशः गर्दी केलेली आहे. अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात जनसमुदाय जमत आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्याबरोबरच माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनाही भेटण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी लोकसमुदाय दिसून येत आहे. पनवेलच्या विकासाच्या दृष्टिकोनातून प्रामाणिकपणे गेल्या अनेक वर्षांपासून ठाकूर कुटुंबीय सक्रिय आहे. सर्वांच्या मदतीला धावून जाणे हा त्यांचा स्थायीभाव आहे. त्यामुळेच लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या पाठीशी जनमत असल्याचे सर्वज्ञात आहे.

## कर्जतमध्ये ९५ जणांनी रक्तदान करून शहिदांना वाहिली आदरांजली

कोठारी यांनी आपल्या मनोगतात, कर्जत तालुक्यात सर्वात जास्त वेळा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. सुमारे ६१ हजारच्या वर बाटल्यांचे संकलन झाले आहे. ज्या वेळी आपल्या एखाद्या गंभीर आजार असलेल्या नातेवाईकाला रक्ताची गरज लागते त्या वेळी एका रक्त पिशवीचे महत्त्व समजते. म्हणून रक्तदान करा, असे आवाहन केले.

श्रीकृष्ण सुपे यांनी सर्वप्रथम रक्तदान करून या शिबिराचा शुभारंभ केला. कल्याण येथील संकल्प रक्तकेंद्राच्या डॉ. सोनाली देसाई, राजशेखर नायर, समृद्धी देसाई, समृद्धी देसाई, अंजली दुबल, शितल पवार, रोहिणी ओटी, कल्पना जोशी, कोमल गौर आदींनी रक्त संकलनाचे काम केले.

या शिबिरावेळी माजी नगराध्यक्ष राजेश लाड, भालचंद्र जोशी, संदीप भोईर, निलेश परदेशी, पंकज शहा, मिलिंद खंडागळे, रघुनाथ खैरे, दीपक बडगुजर, प्रभाकर करंजकर, महेश पाल, उमेश गायकवाड, शंकर भुसारी, प्रशांत सदावर्ते, नवाज तांबोळी, अमिर मणियार आदी उपस्थित होते.

## बीसीटी लॉ कॉलेजमध्ये कार्यशाळा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयात मंगळवारी (दि. २६) संविधान दिनाचे औचित्य साधून घटनात्मक कायद्यावरील एक दिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. रिसर्च क्लब आणि नॅशनल डे सेलिब्रेशन कमिटी यांच्या संयुक्त प्रयत्नातून आयोजित या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांची भारतीय राज्यघटना आणि समकालीन समाजाला आकार देण्यात त्याच्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल समज वाढविणे होता.

कार्यशाळेची सुरुवात बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँण्ड गोव्याचे मान्यवर सदस्य व घटनात्मक कायद्याचे ख्यातनाम तज्ज्ञ डॉ. उदय वाळुंजीकर यांच्या अभ्यासपूर्ण भाषणाने झाली. वाळुंजीकर यांनी सामाजिक-आर्थिक हक्कांच्या रक्षणासाठी मूलभूत हक्कांचे, विशेषत: जगण्याच्या आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अधिकाराचे महत्त्व अधोरेखित केले. सध्याच्या सामाजिक-आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हानांना सामोरे जाण्यासाठी राज्यघटनेच्या विकसित होत असलेल्या विवेचनाची त्यांनी वकालत केली. त्यांच्या व्याख्यानामुळे समकालीन प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी राज्यघटनेच्या भूमिकेविषयी उपस्थितांना मौल्यवान दृष्टिकोन मिळाला.

मुख्य भाषणानंतर दुसऱ्या सत्रात भारतीय राज्यघटनेचे ऐतिहासिक संदर्भ, गुंतागुंत आणि समकालीन प्रासंगिकता यावर प्रकाश टाकण्यात आला. संग्राम पवार व प्राचार्य सानवी देशमुख यांनी चर्चेचे नेतृत्व केले. प्राचार्य देशमुख यांनी वैयक्तिक हक्कांचे रक्षण आणि सर्व नागरिकांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी राज्यघटनेची महत्त्वाची भूमिका अधोरेखित केली. अधिवेशनाच्या उत्तरार्धात सहाय्यक प्रा. पवार यांनी राज्यघटनेतील मूल्यांप्रती विद्यार्थ्यांची बांधिलकी दृढ करण्यासाठी संवादात्मक उपक्रम सुरू केला. राष्ट्राला मार्गदर्शन करणाऱ्या या मूलभूत तत्त्वांची प्रभावी आठवण करून देणाऱ्या राज्यघटनेच्या प्रस्तावनेच्या सामूहिक पठणात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांच्या घटनात्मक तत्त्वांच्या ज्ञानाचे मूल्यमापन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या आकर्षक प्रश्नमंजुषाने सत्राची सांगता झाली. खुल्या चर्चेसह या प्रश्नमंजुषाने सक्रिय सहभागाला प्रोत्साहन दिले आणि भारतीय लोकशाहीला आकार देण्यात राज्यघटनेच्या भूमिकेबद्दल सखोल कौतुक केले.

प्राचार्य सानवी देशमुख, रिसर्च क्लबच्या प्रभारी डॉ. क्रांती भोवते व राष्ट्रीय दिन उत्सव समितीचे प्रभारी सहाय्यक प्रा. संग्राम पवार यांच्या प्रयत्नांमुळे कार्यशाळा यशस्वी झाली सूत्रसंचालन विद्यार्थी परिषदेच्या सदस्य मृणाल पाटेकर यांनी केले. शुभम चौबे यांनी प्रमुख वक्ते डॉ. वाळुंजीकर यांची उपस्थितांशी औपचारिक ओळख करून दिली, वैदेही वारे यांनी आभार मानले.

# पनवेल मनपातर्फे जंतनाशक मोहीम

## शहर टास्क फोर्सची मुख्यालयात बैठक

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात येत्या ४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबविण्यात येणार आहे. यामध्ये १ ते १९ वर्ष वयोगटातील सर्व मुला-मुलींना जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात येणार आहे. महापालिका क्षेत्रातील सर्व लाभार्थ्यांपर्यंत पोहचण्यासाठी ही मोहीम योग्य पद्धतीने यशस्वीपणे राबविण्यासाठी नियोजन करण्याच्या सूचना आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी दिल्या आहेत.



महापालिका कार्यक्षेत्रात ४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबविण्यासाठी सोमवारी (दि. २५) महापालिका मुख्यालयात शहर टास्क फोर्सची बैठक घेण्यात आली. त्या वेळी आयुक्त तथा प्रशासक चितळे बोलत होते.

याबरोबरच नियमित लसीकरणाचीही बैठक घेण्यात आली. या बैठकीस उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयाचे जनवैद्यक औषधशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रसाद वायंगणकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, माताबाल संगोपन अधिकारी गणेश नायर, सर्व वैद्यकिय अधिकारी, एएनम, जीएनएम, एकात्मिक बाल विकास विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या वेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या शाळा, गृहनिर्माण सोसायट्या, लोकसंख्या, महाविद्यालये अशी सर्व प्राथमिक माहिती एकत्रित करण्याविषयीच्या सूचना दिल्या.

पनवेल महापालिकेच्या वतीने वैद्यकीय आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेंतर्गत अंगणवाड्यांमधील मुले, सर्व शासकीय शाळेचे विद्यार्थी, शासकीय अनुदानित-विनाअनुदानित शाळेचे विद्यार्थी, महापालिका शाळेतील विद्यार्थी, सर्व कनिष्ठ विद्यालये, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रथम वर्षाचे विद्यार्थी या सर्वांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप करण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत ४ डिसेंबर रोजी जी मुले जंतनाशक गोळ्याविना वंचित राहतील त्या मुलांना पुन्हा एकदा १० डिसेंबर रोजी देण्यात येणार आहेत.

**काय आहे संकल्पना?**

**खानपानाद्वारे विविध प्रकारचे जंतू लहान मुलांच्या पोटात जातात. या जंतूमुळे अन्नतील पौष्टीक सत्व मुलांच्या शरीराला मिळत नाहीत. त्यामुळे मुलांचा शारिरीक विकासही खुंटतो तसेच विष्ठेद्वारे जंत बाहेर पडू लागतात. त्यामुळे मूल आजारी पडते. यासाठी दरवर्षी राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा केला जातो. या दिवशी मुलांना जंतनाशक गोळ्या दिल्या जातात.**

# पनवेल शिवसेनेतर्फे आमदार प्रशांत ठाकूर यांचे अभिनंदन



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल विधानसभा मतदारसंघात विजयाचा चौकार मारणारे भारतीय जनता पक्षाचे विजयी उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांना पनवेल शिवसेनेच्या सर्व वरिष्ठ पदाधिकारी यांनी मिळून अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांपासून सामान्य शिवसैनिकापर्यंत सर्वांनीच युती धर्माचे पालन करत आमदार प्रशांत ठाकूर यांचे निवडणुकीत एकदिलाने काम केले. विजयानंतर शिवसेना पदाधिकाऱ्यांनी सामूहिकरित्या त्यांच्या निवासस्थानी त्यांचा जाहीर सत्कार करत अभिनंदन केले. या वेळी संपर्कप्रमुख राजेंद्र यादव, महिला संपर्कप्रमुख शिल्पा देशमुख, उत्तर रायगड महिला जिल्हाप्रमुख सुप्रिया साळुंखे, महानगर प्रमुख तथा माजी नगरसेवक अ‍ॅड. प्रथमेश सोमण, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, महिला जिल्हा संघटक रीना पाटील, महानगर संघटक मंगेश रानावडे, महिला तालुका प्रमुख मंदा जंगले, तालुका उपसंघटक नरेश आत्माराम, उपमहानगरप्रमुख, महेश सावंत, सचिन मोरे, पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनावणे, नवीन पनवेल शहर प्रमुख अतुल मोकल, खारघर शहर संघटक इम्तियाज जलील, तळोजा विभागप्रमुख प्रकाश म्हात्रे, ज्येष्ठ शिवसैनिक राकेश गोवारी, पनवेल शहर व नवीन पनवेल शिवसेनेचे सर्व उपशहरप्रमुख, विभाग प्रमुख, शाखाप्रमुख, शिवप्रेरणा श्रमिक कामगार संघटनेचे प्रमुख प्रतिनिधी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी संपूर्ण निवडणुकीत आपण एक टीम म्हणूनच काम केले याचा अभिमान व्यक्त करत सर्व शिवसेना पदाधिकारी यांचे आभार मानले.

# इनरव्हील क्लब ऑफ पनवेलने ज्येष्ठ नागरिकांची घेतली काळजी

## शांतीवनमध्ये आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिर





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील नेरे येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यरत असलेल्या शांतीवन या संस्थेमध्ये इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे अध्यक्ष डॉ. वीणा मनोहर यांच्या नियोजनाखाली मोफत वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा ८० ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घेतला.

या शिबिरात शांतीवन येथील आधारगृह वृद्धाश्रमातील ज्येष्ठ मंडळी आणि कुष्ठरुग्ण यांच्या विविध तपासण्या करून त्यांना मोफत औषधेही देण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने डोळ्यांची तपासणी, ब्लड शुगर, हाडातील कॅल्शियमचे प्रमाण तसेच ब्लड प्रेशर, दंतचिकित्सा इत्यादी विविध तपासण्या केल्या गेल्या व त्यांना मोफत वैद्यकीय सल्ला तसेच औषधेही देण्यात आली. शिबिरासाठी नवीन पनवेल येथील डॉ. मैथिली लाड व त्यांची टीम, नेत्र तपासणीसाठी डॉ. निकेत गांधी व त्यांचे सहकारी, दंतचिकित्सेसाठी डॉ. अंकिता लोखंडे व सहकारी यांचे बहुमोल सहकार्य लाभले. त्याचप्रमाणे डॉ. सुषमा ससाणे, डॉ. शुभांगी पत्की यांचेसुद्धा सहकार्य लाभले.

तपासणीनंतर प्रत्येक ज्येष्ठ नागरिक आणि कर्मचाऱ्याला क्लबतर्फे कापडी पंचा डेटॉल साबण सॅनिटायझर तसेच टूथ ब्रश टूथपेस्ट हेअर ऑइल मॉइश्चरायझर हँडवॉश या जीवनावश्यक वस्तूंबरोबरच मल्टी विटामिन टेबलेट्स कॅल्शियम सप्लीमेंट प्रोटीन पावडर इत्यादी औषधी देण्यात आली. तसेच आमच्या डॉक्टर्स टीमने सर्व ज्येष्ठ नागरिकांचे या शंका समाधान केले.

शेवटी शांतीवन या संस्थेचे मॅनेजर विनायक शिंदे यांनी इनरव्हील क्लब ऑफ पनवेलचे आभार मानले. क्लबच्या माजी अध्यक्ष मीनल टिपणीस, सुलभा निंबाळकर आणि अनुराधा लोखंडे यांच्या सहभागामुळे शिबिर सुरळीत पार पडले.




# ५५ मोबाईल चोरणारा अटकेत

**पनवेल :** शहरातील उरण नाका, कोळेश्वर चौक येथे असलेल्या पुजारा टेलिकॉम दुकानात घरफोडी करून लाखो रुपये किमतीचे जवळपास ५५ मोबाईल चोरुन नेणाऱ्या एका तरुणास गुन्हे शाखा कक्ष २च्या पथकाने अटक केली. त्याच्याकडून आतापर्यंत ४१ मोबाईल, ज्याची किंमत १९ लाख २२ हजार ७७१ रुपये इतकी आहे. ते हस्तगत करण्यात आले आहेत.

पुजारा टेलीकॉम शॉपच्या शटरचे चोरट्याने कडी-कोयंडा कापून दुकानामधील विकीस ठेवलेले नवीन पेटीपॅक व जुने असे २३,९५,१६३ रुपये किमतीचे एकूण ५५ मोबाईल फोन चोरी करून नेले होते. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. पनवेल शहर पोलिसांचे पथक तसेच गुन्हे शाखा कक्ष २चे पथक आरोपीचा समांतर शोध घेत असताना आरोपी घटनेच्या रात्री मोटरसायकलवरून घटनास्थळ परिसरात वावरत असल्याचे दिसून आले. त्याची ओळख पटविली असता हा गुन्हा आकाश वळकुंडे याने केल्याचे निष्पन्न झाले. त्याला अटक करण्यात आली असून चोरीस गेलेल्या मोबाईल फोनपैकी ४१ हस्तगत करण्यात आले आहेत.



**पनवेल : श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ आणि पनवेल मेवाड उपसंघाच्या वतीने आध्यात्मिक तपोमय चातुर्मास २०२४ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंगळवारी भेट दिली. या वेळी अनुष्ठान आराधिका डॉ. कुमुदलता मारासाब, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, नितीन मुनौथ, राजेश बांठिया, राजू सोनी, संजय जैन, राजेंद्र चपलोत, वैभव वाघमार, शैलेंद्र खेरोदिया, ललित चंडालिया, महावीर सोलंकी, जयंती परमार, महेंद्र सुराना, विजय श्रीमाल, पवन सोनी, जितेश मारू उपस्थित होते.**

# सहकार भारती पनवेल महानगर जिल्हा अध्यक्षपदी त्रिवेणी सालकर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सहकार भारती पनवेल महानगर जिल्हा अध्यक्षपदी त्रिवेणी सालकर, उपाध्यक्षपदी रत्नाकर कुलकर्णी, तर संघटन प्रमुख म्हणून विश्वास शिंदे यांची निवड करण्यात आली. सहकार भारती कोकण विभागाच्या पनवेल येथे झालेल्या बैठकीमध्ये पनवेल महानगर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा या वेळी महाराष्ट्र प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



'कार्यकर्त्यांनी निस्वार्थ वृत्तीने काम करावे. एकत्रित काम करण्याने मोठे यश मिळते. एकट्याने लढण्यापेक्षा कोणत्याही विषयासाठी एकत्रित काम करणे हे सहकार भारतीचे तत्व असल्याचे सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांनी सांगितले. भविष्यात सहकार भारतीची ताकद विस्तारत असून कार्यकर्त्यांच्या कामातून उत्तम दबाव गट बनायला हवा, असेही आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

महाराष्ट्र सहसंघटनप्रमुख प्रवीण बुलाख यांनी कार्यकर्त्यांची जबाबदारी, कार्यपद्धती आणि अपेक्षा याबद्दल मत व्यक्त केले. ज्येष्ठ कार्यकर्ते विष्णू बोबडे यांनी सहकार भारतीच्या सुरुवातीच्या काळातील आठवणींना उजाळा दिल्या. त्या तुलनेत आज सक्षमरित्या ही संस्था उभी असल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. आगामी काळात सहकार भवन उभारण्याबाबत प्रमोद जोशी यांनी अपेक्षा व्यक्त केली.

बैठकीस कोकण विभाग प्रमुख राजू ठाणगे, सहप्रमुख वीणा मोकाशी, कृष्णकांत निमसे उपस्थित होते. सूत्रसंचालन कृष्णकांत निमसे यांनी केले.

**पनवेल महानगर कार्यकारिणी पुढीलप्रमाणे**

पनवेल महानगर जिल्हा रचना : अध्यक्ष त्रिवेणी सालकर, उपाध्यक्ष रत्नाकर कुलकर्णी, संघटन प्रमुख विश्वास शिंदे, महामंत्री कृष्णा राणे, महिला प्रमुख अपर्णा नाडगौडी, महिला सहप्रमुख पल्लवी कोठावदे, सचिव किरण शिंदे, खजिनदार संजय पावसकर; प्रकोष्ठ रचना : हाउसिंग प्रकोष्ठ प्रमुख सुभाष बसवेकर, महिला बचत गट प्रमुख किर्ती जोशी, आयटी प्रकोष्ठ प्रमुख किरण चंदने, बँक प्रकोष्ठ प्रमुख मनोज कोल्हे, बँक प्रकोष्ठ सहप्रमुख समीर शिंदे; पतसंस्था प्रकोष्ठ सहप्रमुख राजेश गोयल, मत्स्य प्रकोष्ठ प्रमुख सुरेंद्र खेडेकर, अधिवक्ता प्रकोष्ठ प्रमुख अ‍ॅड. संतोष सिंग, प्रशिक्षण प्रमुख गणपत सिंग राठोड, लेखापाल प्रमुख धरमपाल गजबीजे; नगर रचना : नवीन पनवेल नगर प्रमुख दीपक शेडगे, पनवेल नगर प्रमुख सुधीर नाडगौंडी, करंजाडे नगर प्रमुख अभिजित थोरात, सहप्रमुख सुमित बांगर, कामोठे नगर प्रमुख अक्षय शिंदे, कामोठे नगर सहप्रमुख योगेश अभाळे.

# गव्हाण विद्यालयात संविधान दिन साजरा

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल तालुक्यातील गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये देशाच्या संविधान दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या वेळी संविधान ग्रंथाचे आणि संविधान निर्मितीमध्ये सिंहाचा वाटा असणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, क्रीडा शिक्षक एस.एस. पारखे, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, संगणक शिक्षिका सोनाली घरत व जोत्स्ना ठाकूर, सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर. पाटील तसेच सेवक दयानंद खारकर, अरुण कोळी आदी उपस्थित होते.




# खारघरमध्ये गोल्डन जॅकलचा मुक्त संचार

**खारघर : प्रतिनिधी**

खारघरच्या पाणथळ भागात गोल्डन जॅकल (सोनेरी कोल्हा) या कोल्ह्याची प्रजातीचा वावर असल्याचे अनेक वेळा पहावयास मिळाले आहे. मध्यंतरी मागील महिन्यात अपघातात एका सोनेरी कोल्ह्याला मृत्यू झाल्याची बाब खारघर शहरात पहावयास मिळाली होती. पुन्हा एकदा पक्षी निरीक्षकांच्या कॅमेऱ्यात तब्बल तीन सोनेरी कोल्हे खारघर सेक्टर २५मध्ये कैद झाले आहेत. खारघर शहरातील हा भाग खाडीकिनारी वसलेला भाग आहे. या परिसरात हिवाळ्यात विदेशी पक्ष्यांचेदेखील आगमन होत असते. पक्षी निरीक्षणासाठी बाहेर पडलेले प्रदीप कुमार चौधरी यांना एकाच ठिकाणी खारफुटीत तीन सोनेरी कोल्हे फेरफटका मारताना नजरेस पडले. चौधरी यांनी तत्काळ आपल्या कॅमेऱ्याच्या लेन्समध्ये या कोल्ह्याचे फोटो टिपले. या वेळी चौधरी यांच्यासोबत पक्षीमित्र डॉ. सिद्धार्थ पवार हेदेखील



# रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये संविधान दिन उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि. २६) आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला.

महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञान विभागातील तृतीय वर्षाच्या आदिती हिने संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी संविधान दिन दरवर्षी का साजरा केला जातो याबद्दल माहिती दिली तसेच राज्यघटनेवरील प्रभाव, संविधान सभा, घटना समिती या माध्यमातून भारतीय संविधानाची निर्मिती कशा पद्धतीने झाली हे स्पष्ट केले. भारतीय राज्यघटनेचे अंतरंग उलगडताना त्यांनी संघराज्य, नागरिकत्व, मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्वे, मूलभूत कर्तव्य, संघराज्य व केंद्र सरकार, राज्य शासन, अनुसूची, पंचायतराज, संघराज्य, वाणिज्य, व्यापार, निवडणुका, राजभाषा, आणीबाणी व संकीर्ण याबाबत सविस्तर विवेचन केले.

आजीवन अध्ययन व विस्तार विभाग प्रमुख प्रा. महेश धायगुडे यांनी संविधानाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शगुफ्ता शान यांनी केले. प्रा. गीतांजली ठाकूर यांनी सर्वांचे आभार मानले, तर प्रा. सादिया हलिमा, प्रा. प्रथमेश उदेकर, प्रा. योगिता पाटील व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



# सर्प-विंचूदंशाने होणारे मृत्यू शून्यावर आणण्यासाठी प्रशासनाची विशेष मोहीम

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात सर्पदंश सगळीकडे होत असतात. यामध्ये विंचूदंश हे विशेष असून डॉक्टरांनी सर्प व विंचूदंश झालेल्या रुग्णांना उत्तम सेवा देवून त्यांची काळजी घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले. रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक कॉन्फरन्स हॉल येथे आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

या कार्यशाळेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाट, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे, पद्‌भूषण डॉ. हिम्मतराव बावस्कर आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, रायगड जिल्हा जंगलमय असून समुद्र तटीय आहे. त्यातच जिल्ह्यात पावसाचे प्रमाण जास्त असल्यामुळे सरपटणारे प्राणी या काळात बाहेर येऊन मानवी वस्तीत येत असतात. त्यामुळे सर्पदंश व विंचूदंशाचे प्रमाण वाढत आहे. याकरिता वेगळ्या दिशेने संशोधन करणे गरजेचे आहे. शासनाकडून वैद्यकीय सेवेकरिता डॉक्टर घडावेत याकरिता मोठ्या प्रमाणावर खर्च केला जात आहे. डॉक्टरांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग जनसेवेसाठी करावा.

पावसाळ्यात काम करणाऱ्यांना मजूरांना मोठे गमबूट देण्यात यावेत याकरिता विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. आपण शिकलो, शासकीय नोकरीत आहोत, आपल्याला जनतेला वैद्यकीय सेवा द्यायची आहे अशी मनभावना प्रत्येक डॉक्टराची असली पाहिजे. डॉक्टरांनी सदैव अद्ययावत, सकारात्मक काम करावे. प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या डॉक्टरांनी आपल्या मुख्यालयात राहावे, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यशाळेला उपस्थित असलेल्या डॉक्टरांना दिले.

पद्‌भूषण डॉ. हिम्मतराव बावस्कर यांनी मोठे पुण्याचे काम केले असून त्यांनी सर्पदंश व विंचूदंशावर केलेल्या औषधांचा वापर संपूर्ण कोकणात केला जात असून याबद्दल जिल्हाधिकारी जावळे त्यांचे विशेष आभार मानले. अतिजोखमीच्या गरोदर माता यांचे निदान व उपचार करून त्यांची काळजी घेणे देशासाठी महत्त्वाचे आहे, असेही ते म्हणाले.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाट म्हणाले की, पद्‌भूषण डॉ. हिम्मतराव बावस्कर यांनी जिल्ह्यात अनेक प्रकारच्या विंचूदंशावर उपचार करुन नागरिकांना जीवदान दिले असल्यामुळे त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना शासनाकडून पद्‌भूषण ही पदवी देण्यात आली असून ती कौतुकास्पद आहे. जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या डॉक्टरांनी मुख्यालयात राहून जनसेवा करावी, अशा सूचना त्यांनी या वेळी संबंधितांना दिल्या.

सीएसआर फंडातून एक्सरे मशीन घेण्यात आली असल्यामुळे रुग्णांना एक्सरे काढण्यासाठी इतरत्र जाण्याची आवश्यकता भासणार नाही तसेच जिल्हा वार्षिक योजनेमधून आणखी एक एक्सरे मशीन घेण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. शासनाकडून वैद्यकीय सेवेकरिता मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जात असून त्याचे योग्य ते नियोजन झाले पाहिजे. डॉक्टरांनी आपल्या कार्यक्षेत्रात हजर राहून रुग्णांना उत्तम सेवा देऊन चांगले काम करावे, असेही डॉ. बास्टेवाड यांनी सांगितले.

कार्यशाळेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन करण्यात आली. या कार्यशाळेला जिल्ह्यातील वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी तसेच डॉक्टर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे आभार डॉ. फाळके यांनी मानले.



## जाहिर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **राजूबाई गोविंद म्हात्रे व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजेः वशेणी (५५३३४४)**
**(PU-ID १०४४११६९३४५), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ९५/१/अ<br>खाते क्रमांक: ३४ | १ | ०.४९.००<br>पो.ख. ०.०२.९० | ७.३३ |
| | | एकुण ०.५१.९० | |
| | एकूण क्षेत्र ०.५१.९० गुंठे | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक :- २६/११/२०२४**

**सही**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस.
भूखंड कमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे,
तालुका पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

# अलिबागेत कमी दाबाने पाणीपुरवठा; भाजपची मुख्याधिकाऱ्यांकडे तक्रार

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग शहरातील अनेक भागात गेल्या महिन्याभरापासून कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. यात मयेकर वाडी आणि साधना अपार्टमेंट आणि रामनाथमधील परिसराचा समावेश आहे. भाजपच्या तालुका महिला मोर्चाच्या चिटणीस भक्ती अशोक वारगे यांनी याबाबतची तक्रार नोंदवली आहे.

अलिबाग शहरात नगर परिषदेकडून सकाळ, संध्याकाळ पाणीपुरवठा केला जातो, मात्र गेल्या काही दिवसांपासून हा पाणीपुरवठा कमी दाबाने आणि अपुऱ्या प्रमाणात होत असल्याच्या तक्रारी आहेत. मयेकरवाडी, साधना अपार्टमेंटसह जिल्हाधिकारी कार्यालयालगतच्या रामनाथ विभागात कमी दाबाने पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे.

अशातच काही जणांनी पाण्याच्या पाईपलाईनला अनधिकृतपणे पंप जोडला असल्याने पाणी समस्येत अधिकच भर पडली आहे. त्यामुळे त्याची तपासणी करून चौकशी करावी, अशी मागणी वारगे यांनी मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे.

## ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली
## लोधिवली, ता.खालापूर, जि. रायगड
### विकास कामे जाहिरात

ग्रामपंचायत लोधिवली हद्दीतील ग्रामनिधी अंतर्गत सन २०२४-२५ या वर्षाच्या करिता खालील प्रमाणे विकासकामे करावयाची आहे. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. २७/११/२०२४ ते दि. ०८/१२/२०२४ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.०८/१२/२०२४ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत उघडण्यात येतील किंवा ग्रामपंचायत ठरवेल त्या दिवशी उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत लोधिवली यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे/रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव व योजना नाव | निधी | अ. रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लोधिवली वाघेश्वर ढाबा ते लोधिवलीवाडी रस्ता दुरुस्ती करणे. | ग्रामनिधी सन २०२४-२५ | ५५००० | २०० | १% | ६ म. |
| २ | लोधिवली अंतर्गत रस्त्यावर खड्डे भरणा करणे. | ग्रामनिधी सन २०२४-२५ | ५१३०० | २०० | १% | ६ म. |
| ३ | नढाळ ते नढाळ तलाव गणेश तलाव गणेश विसर्जन रस्त्यावरील खड्डे भरणा करणे. | ग्रामनिधी सन २०२४-२५ | ९६००० | २०० | १% | ६ म. |
| ४ | वरोसे ते नढाळ तलाव गणेश विसर्जन रस्त्यावरील खड्डे भरणे. | ग्रामनिधी सन २०२४-२५ | १५११०० | ५०० | १% | ६ म. |

**टीप:-**
१) निविदा भरणाऱ्या सर्व कंत्राटदारांनी दि. २७/११/२०२४ ते दि.०८/१२/२०२४ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय लोधिवली येथे सिलबंद लिफाफा जमा करणे बंधनकारक आहे.
२) निविदा भरताना आपले दर जी.एस.टी. वगळून भरणे बंधनकारक आहे. जी.एस.टी.चे दर संबंधित विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.
३) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
४) मुदतीनंतर आलेल्या खाडाखोड करून साक्षांकित न केलेल्या व अटीशर्तीयुक्त निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
५) सदर कामांच्या निविदा अंदाजपत्रक निविदा व अटी शर्ती बाबत कार्यालयात निविदा धारकास माहितीपत्रक देण्यात येईल.
६) कोणत्याही नामंजूर निविदासंदर्भात निविदा धारकास कोणत्याही प्रकारे लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.
७) १५ वा वित्त आयोग कामांची बिले अनुदान प्राप्त झाले नंतर बिल अदा करण्यात येईल.
८) ठेकेदार ग्रामपंचायतीचा येणे बाकीदार असल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

**सही/-**
**भाऊसाहेब कं गोल्हार**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली**

**सही/-**
**सौ. पूजा नितीन तवले**
**सरपंच,**
**ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली**

# ‘ॲडव्हेंचर्स सोल्स’कडून कोकणकड्याची स्वच्छता

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील ॲडव्हेंचर्स सोल्स या संस्थेकडून महाड कोकण दिवा या टेहळणी गडाची स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. संस्थेच्या सदस्यांनी कोकण कडा सर करून या ठिकाणी स्वच्छता केली. संस्थेकडून प्रतिवर्षी या ठिकाणी मोहीम राबवण्यात येत असल्याची माहिती विशाल खांबे यांनी दिली.

ॲडव्हेंचर्स सोल्स ही संस्था महाड तालुक्यात साहसी मदतीकरिता प्रसिद्ध आहे. साहसी प्रशिक्षण देण्याबरोबरच तालुक्यात कुठेही आपत्तीजनक स्थिती उद्‌भवल्यास संस्थेचे पदाधिकारी सदस्य धाव घेतात. त्यांच्याकडे असलेल्या उपलब्ध साहित्यातून मदतीचा हात देऊन प्रसंगी जीव वाचवला जातो. अशा या संस्थेकडून प्रतिवर्षी कोकण दिवा या ठिकाणी माहीम राबवली जाते. या मोहिमेतून गडाची स्वच्छता केली जाते. २४ नोव्हेंबर रोजी संस्थेकडून हा उपक्रम घेण्यात आला.

या मोहिमेमध्ये संस्थेचे अध्यक्ष प्रा. विशाल खांबे यांच्यासह खोपकर, पराग माने व इतरांनी सहभाग घेतला. कोकण दिवा हा एक टेहळणी बुरुज असून पुणे आणि रायगड जिल्ह्याच्या मध्यवर्ती भागात आहे. उंच सुळका असलेल्या या सुळक्यावर चढाई करणे अवघड आहे. मात्र याच भागात वास्तव्यात असलेल्या संस्थेया सदस्यांनी गेल्या अनेक वर्ष या ठिकाणी मेहनत घेतली आहे.

## ‘‘नोटीस’’

विषयः- **उशिरा जन्म नोंद करणेबाबत.**

संदर्भ :- अर्जदार श्री. मुहम्मद हम्जा भोलु अली, रा.मु, वडघर, ता. पनवेल, जि. रायगड यांचा दि. २०/०९/२०२४ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. मुहम्मद हम्जा अली, रा. मु, वडघर, ता. पनवेल, जि. रायगड यांनी कु.शोएब हम्जा अली यांची उशिरा जन्म नोंदीचा आदेश मिळणेकामी कार्यकारी दंडाधिकारी ता. पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक १३/१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर जन्म नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काहीएक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(संजय भालेराव**
प्र. निवासी नायब तहसलिदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी पनवेल

पत्र.क्र.मशा/प्रशा-१/ उशिरा जन्म नोंद नोटीस/२०२४/२५६/२०२४

## TENDER NOTICE

MAHAVITARAN

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estimated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | BILLING/EE/ GOREGAON/ MHD/T-06 /2024 | Monthly Meter Reading of LT consumers up to 20kW (Excluding AG consumers other than Ag metered UrbanLT consumers coming under Municipal Corporation , Municipal Council , Nagar Parishad and Nagar Panchayat.) under **Mahad sub division** to be done using Mahavitaran Mobile App,IR/RF HHUs,Bill Printing and Bill distribution upto consumer /consumer premises for three financial years | 225.70 | 75240/- | 5000+18 %GST= 5900/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Dt. 26.11.2024 to Dt. 08.12.2024. Submission of Bid is up to Dt. 09.12.2024 till 17.00 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Addl. Executive Engineer, Tel No. 9029102659 M.S.E.D.Co.Ltd. Chinchavali, Goregaon, Tal: Mangaon Dist.-Raigad-402103.

**Executive Engineer Goregaon Division**

सिडको
शहरांचे शिल्पकार

## CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
## PUBLIC NOTICE

**TOWN PLANNING SCHEME NO. 8, NAINA**
(at part villages of Ambivali, Belavali, Chikhale, Lonivali, Moho, Pali Khurd and Wangani Tarf Waje)
(Under Rule no.13 of the Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974)
No. ARB/TPS-8/GEN/2024/01.

The NAINA Draft Town Planning Scheme No.8 (at part villages of Ambivali, Belavali, Chikhale, Lonivali, Moho, Pali Khurd and Wangani Tarf Waje) has been sanctioned by the Vice Chairman and Managing Director, CIDCO under sub-section (2) of section 68 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 vide Notification No. CIDCO/NAINA/TPS-08/2024/104, dated 8th July 2024, in exercise of the powers delegated to him by Urban Development Department vide Notification No.TPS-1817/973/C.R.103/17/UD-13, dated 13th September, 2017. The said Notification of draft sanction is published in *Maharashtra Government Gazette*, Extraordinary, Part-II, dated 9th July 2024.

The Government of Maharashtra in Urban Development Department *vide* Notification No.TPS-1224/1343/CR-78/24/TPS-8/UD-12 dated 7th August 2024 under sub-section (1) of section 72 of the said Act, has appointed Smt. Asha Shailesh Dahake, Retired Assistant Director of Town Planning, as the Arbitrator for the said sanctioned Draft Scheme.

I, the undersigned therefore in accordance with Rule No.13 of Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974, declare by this Notice that, I have commenced the duties as Arbitrator for NAINA Town Planning Scheme No.8 from 3rd October 2024.

All the owners of the lands included in this Town Planning Scheme will be served with special notice in form No.4 to submit their suggestions or objections in respect of proposals of the sanctioned draft Town Planning Scheme in due course.

Those owners or interested persons of the lands included in the NAINA Town Planning Scheme No. 8, who have been injuriously affected by making of this scheme are hereby informed that they shall be entitled to make a claim of compensation as per section 102 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, before the undersigned within a period of 60 days from the date of appearing this Notice in the *Maharashtra Government Gazette*.

Dated: 3rd October 2024
Place: NAINA Office, 7th floor,
Tower No. 10, Belapur Railway Station Complex,
C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400614.

**ASHA SHAILESH DAHAKE**
**Arbitrator,**
Town Planning Scheme No. 8, NAINA
(at part villages of Ambivali, Belavali, Chikhale, Lonivali, Moho, Pali Khurd and Wangani Tarf Waje).

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

## शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र मर्यादित
## जाहीर सूचना

**नगर रचना परियोजना क्र. ८, नैना**
(आंबिवली, बेलवली, चिखले, लोणीवली, मोहो, पाली खुर्द आणि वांगणी तर्फे वाजे या भागशः गावांत)
(महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम, १९७४ च्या नियम क्र.१३ अन्वये)
क्रमांक: लवाद /नरयो-८/ सर्वसाधारण/२०२४/०१

ज्याअर्थी, नैना प्रारुप नगररचना परियोजना क्र. ८ ही उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांनी नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस/१८१७/९७३/प्र. क्र.१०३/१७/नवि-१३, दिनांक १३ सप्टेंबर २०१७ अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६८ पोट-कलम (२) अन्वये अधिसूचना क्र. सिडको/नैना/टीपीएस-८/२०२४/१०४ दिनांक ८ जुलै २०२४ प्रमाणे मंजूर केली आहे. उक्त अधिसूचना ही **महाराष्ट्र शासन राजपत्रात** असाधारण भाग-२ मध्ये दिनांक ९ जुलै २०२४ रोजी प्रसिद्ध झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगरविकास विभागाने, अधिसूचना क्र.टीपीएस-१२२४ / १३४३ / प्र.क्र. ७८ / २४ / नरयो-८ / नवि -१२, दिनांक ७ ऑगस्ट २०२४ अन्वये अधिनियमांच्या कलम ७२ पोट-कलम (१) प्रमाणे, उक्त मंजूर प्रारुप परियोजनेसाठी श्रीमती. आशा शैलेश डहाके, निवृत्त सहायक संचालक नगर रचना यांची लवाद म्हणून नेमणूक केली आहे.

म्हणून महाराष्ट्र नगररचना परियोजना नियम क्र. १९७४ च्या नियम क्र. १३ प्रमाणे या सूचनेद्वारे मी निम्नस्वाक्षरीकार जाहीर करते की, नगररचना परियोजना नैना क्र. ८ (आंबिवली, बेलवली, चिखले, लोणीवली, मोहो, पाली खुर्द आणि वांगणी तर्फे वाजे या भागशः गावांत) करीता लवाद म्हणून दिनांक ०३/१०/२०२४ पासून कर्तव्ये पार पाडण्याचे काम सुरु केले आहे.

या नगररचना परियोजनेत समाविष्ट झालेल्या सर्व जमीनधारकांना उक्त मंजूर नगररचना परियोजनेच्या प्रस्तावासंबंधी सूचना किंवा हरकती सादर करण्यासाठी योग्य वेळी नमुना क्र. ४ मध्ये सूचना बजावण्यात येईल.

जे जमीनधारक किंवा परियोजनेत समाविष्ट झालेल्या जागांमध्ये हितसंबंध असलेल्या व्यक्ती उक्त परियोजना तयार केल्यामुळे अपायकारकरित्या बाधित झालेले असतील त्यांना कळविण्यात येते की, ते उक्त अधिनियमांच्या कलम १०२ प्रमाणे नुकसानभरपाई मिळण्यासाठी निम्नस्वाक्षरीकार यांचेसमोर ही जाहीर सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांचे मुदतीपर्यंत दावे सादर करणेस पात्र राहतील.

दिनांक - ०३/१०/२०२४
**पत्ता :** नैना कार्यालय, टॉवर नं. १०,
सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल,
सीबीडी बेलापूर- नवी मुंबई - ४००६१४

**आशा शैलेश डहाके**
लवाद,
नगर रचना परियोजना क्र. ८, नैना
(आंबिवली, बेलवली, चिखले, लोणीवली,
मोहो, पाली खुर्द आणि वांगणी तर्फे वाजे या भागशः गावांत)

**सिडको/जनसंपर्क/३३५/२०२४-२५**

# अभिनंदनाचा वर्षाव





पनवेल : विधानसभा निवडणुकीत चौथ्यांदा विजयी होण्याचा मान मिळवणारे आमदार प्रशांत ठाकूर, मार्गदर्शक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच विजयात योगदान देणारे भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांचे अनेकांनी अभिनंदन केले.



# नागोठण्यात महायुतीचा जल्लोष

## आमदार रविशेठ पाटील यांच्या विजयाने कार्यकर्ते बेहद खुश





**नागोठणे : बातमीदार**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत पेण-सुधागड-रोहा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार रविशेठ पाटील यांनी साधारण ६० हजारांच्या फरकाने विजय मिळवला. या विजयाने नागोठण्यातील महायुतीचे कार्यकर्ते बेहद खुश झाले असून महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी एकदिलाने काम केल्यामुळे आमदार रविशेठ पाटील प्रचंड बहुमताने विजयी झाले असल्याची प्रतिक्रिया भाजप नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी यांनी दिली.

आमदार रविशेठ पाटील यांच्या विजयानंतर नागोठणे शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करून व लाडू वाटून विजयाचा जल्लोष साजरा केला. दरम्यान, भाजप शहर अध्यक्ष सचिन मोदी यांच्या वॉर्ड नंबर एकमध्ये आमदार रविशेठ पाटील यांना २२५ मतांची आघाडी दिली. त्यांनी महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.

सचिन मोदी यांनी आयोजित केलेली विजयी रॅली छत्रपती शिवाजी महाराज बाजारपेठ, खुमाचा नाका, गांधी चौकमार्गे ग्रामदैवत जोगेश्वरी मातेच्या मंदिरात येऊन सांगता करण्यात आली. या रॅलीत राष्ट्रवादीचे नेते शिवराम शिंदे, विलास चौलकर, भाजप नेते किशोर म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष सोपान शिंदे, श्रेया कुंटे, रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, एकनाथ ठाकूर, महिला तालुका अध्यक्ष अपर्णा सुटे, राष्ट्रवादी युवा नेते प्रथमेश काळे, भाजप तालुका चिटणीस अनिल पवार, उपाध्यक्ष मोरेश्वर म्हात्रे, विभाग अध्यक्ष ज्ञानेश्वर शिर्के, अल्पसंख्याक मोर्चा तालुका अध्यक्ष रऊफ कडवेकर, ग्रामपंचायत सदस्य पूनम काळे, विवेक रावकर, शिवसेना शहर अध्यक्ष संतोष चितळकर, प्रमोद गोळे, विठोबा माळी, ॲड. गणेश जाधव, ॲड. रमेश जाधव, शेखर गोळे, तिरत पोलसानी, राजन दुबे, धनराज उमाळे, अशोक अहिरे, अंकुश सुटे, नितीन राजीवले, गणेश घाग, बाबू घाग, प्रमोद नागोठणेकर, किसन बोरकर, सखाराम ताडकर, गौतम जैन, चंद्रकांत भोईर, संतोष कावेडिया, उदय लाड, प्रियांका पिंपळे, मुग्धा गडकरी, शितल नांगरे, फातिमा सय्यद आदींसह महायुतीचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

या वेळी नागोठणे पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# ऑपरेशन नन्हे फरिश्तेमुळे ४१४ मुले पुन्हा एकत्र!

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे, रेल्वे संरक्षण दल (आरपीएफ) हरवलेल्या मुलांना त्यांच्या कुटुंबियांशी जुळवण्यास मदत करते. आरपीएफकडे रेल्वे मालमत्ता, प्रवासी क्षेत्र आणि प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. याशिवाय ते रेल्वे मंत्रालयाने जारी केलेल्या सुटका केलेल्या मुलांसाठी प्रमाणित कार्यप्रणालीनुसार जबाबदारी पार पाडत आहे आणि ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत मुलांना वाचवण्यासाठी इतर भागधारकांसोबत काम करते.

१ ऑगस्ट ते ३१ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत मध्य रेल्वेच्या रेल्वे संरक्षण दलाने एकूण ४१४ मुलांना (३०६ मुले आणि १०८ मुली) त्यांच्या कुटुंबियांसह एकत्र करून जुळवून देऊन त्यांना मदत केली.

### सुटका करण्यात आलेल्या मुलांचे महिनानिहाय तपशीलमध्ये

**ऑगस्ट २०२४ : ९७ मुलगे, ४४ मुली, एकूण १४१ मुले**
**सप्टेंबर २०२४ : १२५ मुलगे, ३५ मुली, एकूण १६० मुले**
**ऑक्टोबर २०२४ : ८४ मुलगे, २९ मुली, एकूण ११३ मुले**
**एकूण मुलगे ३०६, एकूण मुली १०८, एकूण मुले ४१४**

काही मुले भांडण किंवा काही कौटुंबिक समस्यांमुळे किंवा चांगल्या आयुष्याच्या किंवा शहराच्या ग्लॅमरच्या शोधात आपल्या कुटुंबियांना न सांगता रेल्वे स्टेशनवर येणारी असतात ज्यांना रेल्वे कर्मचारी ओळखतात. हे प्रशिक्षित कर्मचारी विविध स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने मुलांशी संपर्क साधतात, त्यांच्या समस्या समजून घेतात आणि त्यांना त्यांच्या पालकांशी पुन्हा एकत्र येण्यासाठी सल्ला देतात. या उदात्त सेवेबद्दल अनेक पालक मनापासून कृतज्ञता आणि आभार व्यक्त करतात.

# माथेरानच्या गटारांमध्ये घाणीचे साम्राज्य

**माथेरान : प्रतिनिधी**

पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान शहरात मुख्य रस्त्यालगत सांडपाण्याचा निचरा करणाऱ्या गटारांवर अतिक्रमण आहे. त्यामुळे हा कचरा पालिका कर्मचाऱ्यांना काढता येत नसल्याने या ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरले असून येणारे पर्यटकदेखील स्वच्छतेबाबत प्रश्न उपस्थित करीत आहेत.

माथेरान पर्यटनस्थळी मुख्य बाजारपेठेत रस्त्याच्या कडेला असणाऱ्या गटारांच्या बाजूला केलेल्या अतिक्रमणांमुळे सफाई कामगारांना कचरा उचलण्यात अडचणी येतात. त्यामुळे कचरा तसाच गटारात पडून राहतो. या अस्वच्छतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावरही याचा परिणाम होत आहे. येथे मुख्य बाजारपेठेतसुद्धा रस्त्याच्या कडेला गटाराच्या बाजूला नगरपालिकेच्या जागेत पत्र्याचे कंपाउंड टाकून जागा बळकावण्याचा प्रयत्न केला जात आहे. पालिका प्रशासनाने अतिक्रमण काढून टाकावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# आमदार दळवींच्या विजयात सर्व समाजाकडून योगदान

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**



अलिबाग मुरूड मतदा संघात महायुतीचे उमेदवार कार्यसम्राट आमदार महेंद्र दळवी यांच्या विजयासाठी अलिबाग-मुरुड विभागात खासदार सुनील तटकरे यांचे मोलाचे योगदान लाभले. चणेरा विभागात भटके विमुक्त भाजप आघाडीचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस राजू साळुंखे तसेच रोहा तालुका शिवसेना प्रमुख ॲड. शिंदे किंगमेकर ठरले असून महायुतीच्या सर्व पदाधिकाऱ्यांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

महत्त्वाचे म्हणजे चणेरा विभागातील १२ आदिवासीवाडी यांचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते महिलावर्ग, भंडारी आगरी; त्याचप्रमाणे १४ गाव कुणबी समाजाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समाजातील सर्व घटकांचे तळगाळातील कार्यकर्त्यांचे व मतदार बंधू आणि भगिनींचे मोठे आशीर्वाद मिळाल्याने भाजप राज्य सरचिटणीस राजू साळुंखे तसेच रोहा तालुका शिवसेनाप्रमुख ॲड. शिंदे यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे, तर अलिबाग मुरूड मतदारसंघातील कार्यसम्राट आमदार यांनी सर्व जनतेचे आभार व्यक्त केले आहे.

आदिवासी बांधव, कुणबी, आगरी व समाजातील सर्व घटकांचे समस्या प्रश्न सोडवण्यासाठी आमदार महेंद्र दळवी नक्कीच प्रयत्न करतील, असा विश्वास राजू साळुंखे यांनी व्यक्त केले.

# कोर्लई ते एकविरा पालखी पदयात्रा

**रेवदंडा : प्रतिनिधी**



साई सेवक एकविरा मंडळ आयोजित कोर्लई ते एकविरा पालखी पदयात्रेस प्रारंभ झाला. या पालखी पदयात्रेत एकूण १०१ जणांचा सहभाग असल्याचे साई सेवक एकविरा मंडळ कोर्लईचे अध्यक्ष अभय पाटील यांनी सांगितले.

प्रतिवर्षाप्रमाणे कोर्लई येथील साई सेवक एकविरा मंडळाचे वतीने कोर्लई ते एकविरा पालखीसह पदयात्रेचे आयोजन २५ ते २९ नोव्हेंबरदरम्यानच्या कालावधीत करण्यात आले आहे. या पालखी पदयात्रेस कोर्लई दत्त मंदिर येथून सकाळी ८ वाजता प्रारंभ झाला. कोर्लई रहिवासी व मुंबई सायन येथील गजानन पाटील हे साई सेवक एकविरा मंडळ कोर्लईचे संस्थापक असून सलग १६व्या वर्षी कोर्लई येथून पालखीसह पदयात्रा आयोजन त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

साई सेवक एकविरा मंडळाचे अध्यक्ष अभय पाटील, उपाध्यक्ष मारुती पाटील, खजिनदार जितेंद्र पाटील, सहखजिनदार राजू आग्रावकर, सदस्य सोमनाथ भोबर, महेश पाटील, राजन पाटील, चंद्रकांत भाटे, संदेश पैतरी, मनोहर कोटकर, संजय बलकवडे, संतोष बलकवडे, दयानंद कणगी, राजन बलकवडे, राजन पाटील, अमोल पाटील, विवेक पाटील, महेश पाटील, विवेक बलकवडे, पवन भोईर, पंकज कोकाटे, निलेश पाटील, वसंत सोडेंकर असून सर्व जण परिश्रम घेत आहेत. या वर्षी पालखी पदयात्रेस किशोर पाटील यांचे सौजन्य लाभले आहे.

पालखी पदयात्रा २९ नोव्हेंबर रोजी श्री क्षेत्र एकविरादेवी कार्ले येथे दर्शनाचा लाभ घेईल तसेच साई सेवक एकविरा मंडळाच्या वतीने ७ डिसेंबर रोजी कोर्लई दत्त मंदिर येथे महापूजा, महाप्रसादाचे आयोजन व सांगता समारंभ आयोजित करण्यात येणार असून या वेळी मान्यवरांचा सत्कार सोहळ्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# मानसिक आरोग्य सुदृढ होण्यासाठी आध्यात्माची जोड हवी -प्रल्हाद पै

**कर्जत : प्रतिनिधी**



माणूस जेव्हा पॉझिटिव्ह विचार करतो तेव्हा त्याच्या शरीरात पॉझिटिव्ह केमिकल्स निर्माण होतात. माणूस आनंदी असला की शरीरात हॅपी हॉर्मोन्स तयार होतात आणि या हॅपी हॉर्मोन्समुळे माणूस आनंदी होतो. मानसिक आरोग्य सुदृढ होण्यासाठी आध्यात्माची जोड महत्त्वाची आहे, असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन जीवन विद्या मिशनचे प्रल्हाद वामनराव पै यांनी केले.

थोर तत्त्वज्ञ, समाजसुधारक श्री वामनराव पै यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. कर्जतमधील जीवनविद्या ज्ञानपीठाधध्ये २९ नोव्हेंबरपर्यंत आनंद मेळावा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. सकाळच्या सत्रामध्ये ज्ञानेश्वर माऊलींचा हरिपाठ, संगीत जीवनविद्या, दिव्य अनुभूती देणारी मानसपूजा, मानसिक शांतता देणारी शरीरसाधना, कृतज्ञतापूर्वक करण्यात आलेले गुरुपूजन अशा विविध उपक्रमांचे आय़ोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जीवनविद्या मिशन संस्थेसाठी आयुष्यभर कार्य करणाऱ्या काही खास लोकांना जीवनविद्या गौरव या पुरस्काराने गौरविण्यात आले.

ज्येष्ठ नामधारक दिलीप कुलकर्णी आणि ज्येष्ठ प्रबोधक विश्वनाथ कामत यांना या वर्षीच्या जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून हजारो शिष्यमंडळी सहभागी होत आहेत. दररोज दोन पर्वात विविध उपक्रमांचे आयोजन या कार्यक्रमांतर्गत करण्यात येणार आहे. कर्जतमध्ये जीवनविद्या मिशनचा आनंद मेळावा, डॉ. विद्याधर लाड आणि डॉ. शिल्पा लाड यांनी प्रल्हाद पैंसोबत मानसिक आरोग्य कसे राखावे? या विषयावर संवादात्मक चर्चा साधली.

दुसऱ्या सत्रामध्ये यंदा जीवनविद्या मिशनतर्फे एक नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. जीवनविद्या मिशनचे आजीव विश्वस्त प्रल्हाद पैंसोबत अनेक मान्यवर या सेशनमध्ये चर्चात्मक संवाद साधणार आहेत. पहिल्या दिवशी कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात मुख्य हार्ट सर्जन असलेले डॉ. विद्याधर लाड आणि एन. एम. मेडिकलच्या ब्रेस्ट रेडिऑलॉजिस्ट डॉ. शिल्पा लाड यांनी संवाद साधला. वैद्यकीय क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी करणाऱ्या या डॉक्टर दाम्पत्याने प्रल्हाद पै यांच्यासोबत 'मानसिक आरोग्य कसे राखावे' या विषयी दिलखुलास गप्पा मारल्या. त्यांनी या क्षेत्रात डॉक्टरांना पेलावी लागणारी अनेक आव्हाने तसेच अनेक जटील समस्या मांडल्या. या मुलाखतीदरम्यान प्रल्हाद पै यांनी सर्व जनसमुदायासमोर त्या प्रश्नांची उत्तरे देताना जणू सर्वांसाठी सुखी आणि सुदृढ आरोग्याचे गुपितच खुले केले. आजार शारीरिक असो वा मानसिक तो बरा करण्यासाठी औषधोपचारांसोबत चांगले विचार प्रतिबंधनात्मक तसेच उपचारात्मक ठरतात. यासाठी जीवनविद्या मिशनची विश्वकल्याणकारी विश्वप्रार्थना सर्वांनी सतत म्हणावी तसेच जीवनविद्या मिशनची शरीर साधना अवश्य करावी, असे आवाहन त्यांनी केले. त्याचप्रमाणे आजवर ज्यांना या प्रार्थनेचा फायदा झाला आहे अशा अनेक लोकांची उदाहरणे सांगून त्यांनी या विचारांचे महत्त्वदेखील पटवून दिले.

# 'आमदार दळवींना मतदारांकडून विकासकामांची पोचपावती'



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग मुरूड विधानसभा मतदारसंघातील कार्यसम्राट आमदार महेंद्र दळवी यांना मतदारांनी विकासकामांची पावती देऊन दुसऱ्यांदा भरघोस मतांनी विजयी केले आहे, असे मत खारेपाटातील शिवसेनेचे पदाधिकारी पांडुरंग म्हात्रे यांनी व्यक्त केले.

पुढे म्हणाले की आता खारेपाट विभाग व अलिबाग-मुरूड परिसराच्या विकासाला चालना मिळेल. या वेळी त्यांनी खारेपाटातील मतदार बंधू आणि भगिनींचे आभार व्यक्त केले तसेच खारेपाटातील महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांचे व महिलावर्गाचे कौतुक केले. दरम्यान, सर्वत्र या विजयाचा उत्साह दिसून येत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील तक्त्यात नमुद वर्णनाची शेतजमिन मिळकत विदयमान मालक श्री. बाळाराम घारू भोईर व इतर १६ यांचेकडून कायम स्वरूपात खरेदी करण्याचे / घेण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे जाताडे, ता. पनवेल, जि. रायगड.**

| अ.क्र. | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर. चौमी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १. | ९२/२ | ०-०५-३० | ०.६२ |
| २. | ९०/३/क | ०-२०-०० | ३.७५ |
| ३. | ९४/२/अ | ०-५१-८० | ८.४४ |

वर तक्त्यात नमूद शेतजमिन मिळकती त्यात असलेल्या तदंगभूत वस्तूंसह व सर्व हक्कांसह कब्जेदार विदयमान मालक यांचे मालकीच्या व ताबेकब्जातील असून आमचे अशिल आणि विदयमान मालक यांच्यात आपापसात चर्चा होऊन सदरील शेतजमिन मिळकती खरेदी / विक्री करण्याचे ठरलेले आहे. सदरील शेतजमिन मिळकती निर्वेध, निर्जोखमीची असल्याचा व सदरील मिळकती आमचे अशिलांना विकण्याचा हक्क व अधिकार विदयमान मालकांना असल्याचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. त्याप्रमाणे आमचे अशिलांबरोबर सदर विदयमान मालक खरेदीचा व्यवहार पुर्ण करणार आहेत.

तरी सदर शेतजमिन मिळकतींवर कोणाचाही खरेदी, विक्री, तारण, गहाण, लीज, लीन, दान, पोटगी, कोर्ट जप्ती, बक्षीस, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदोपत्री पुराव्यासहित लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास सदर शेतजमिन मिळकतींवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, अथवा असल्यास त्यांनी तो आमच्या अशिलांचे लाभात सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल विदयमान मालकांसोबत खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर आलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**पनवेल**
**दिनांक: २६/११/२०२४**

**सही /-**
**ॲड. दीपक आर. शेळके**
पत्ता: डी-३/१, किनारा सोसायटी,
बावन बंगला, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. नं. ९८२०७९५६०५

# अभिनंदनाचा वर्षाव



पनवेल : विधानसभा निवडणुकीत विजयाचा खणखणीत चौकार मारणारे आमदार प्रशांत ठाकूर यांचे अनेकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com